# शासकीय तंत्रनिकेतन जालना

जालना-छत्रपती संभाजीनगर रोड, नागेवाडी,जालना जि.जालना

Ph No. ०२४८२ - २८२९२९, २८२३२३

E_Mail : principal.gpjalna@dtemaharashtra.gov.in

Web Addres s: www.gpjalna.ac.in


जा.क्र :- शातंजा/आस्था २/२०२६/ 1588 दिनांक : 04 JUL 2026

## उपाहारगृह/कँटीन साठीची निविदा सूचना

शासकीय तंत्रनिकेतन, जालना संस्था परिसरामधील उपहारगृह/ कँटीन साठी केटरर्स यांचे कडून दोन लिफाफ्यात सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | संस्थेतील प्रवेशित एकूण विद्यार्थी व कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची एकूण अंदाजित संख्या | १४०० व्यक्ती संस्था परिसरात कामाचे दिवशी वावरतात. |
| २. | निविदा फॉर्मची किंमत | रु. ५००/- ना परतीची रक्कम |
| ३. | वयाणा रक्कम रुपये | रु. १०,०००/- (दहा हजार रुपये मात्र) परतीची रक्कम |
| ४. | निविदा फॉर्मची किंमत अदा करणे | रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ५. | वयाणा रक्कमेची डीडी काढणं | राष्ट्रीयकृत बँकेचा डीडी नावे<br>प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना Payable at जालना |
| ६. | निविदा फॉर्म उपलब्ध होण्याचे स्थळ | श्री शेख आमीर शेख फारुख,वसतिगृह लिपीक, कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ७. | निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक ०६/०७/२०२६ ते दिनांक १७/०७/२०२६ दु.३.०० पर्यंत सुटीचे दिवस वगळून |
| ८. | निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | दिनांक १७/०७/२०२६ दुपारी ५.०० वाजेपर्यंत सुटीचे दिवस वगळून. |
| ९. | सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांचा तपशिल निविदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती निविदेसोबतच सादर करण्यात यावे. | |
| १०. | निविदा उघडण्याची तारीख दि. २०/०७/२०२६ दुपारी ३.०० वा. | |

१. निविदा संस्थेच्या कार्यालयात आवक/जावक विभागात कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यात जमा करावे.

२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांनी निविदा स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

३. निविदेमध्ये भरलेले दर शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी करार केलेल्या दिनांकापासून ११ महिन्यासाठी लागू राहील व दर हे संपूर्ण कालावधीसाठी अंतिम राहतील.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, जालना.



Scanned with OKEN Scanner

निविदेच्या / सेवेच्या अटी व शर्ती

**१. उपहारगृह / कँटीन सेवा पुरविणेसाठी दोन लिफाफ्यात सीलबंद निविदा भरावयाची आहे.**

२. निविदा फी रु. ५००/- रोखीने रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचेकडे भरण्यात यावे.

३. Earnest Money Deposit (EMD) बयाणा रक्कम रु. १०,००० (दहा हजार मात्र) नॅशनलाइज बँकेचा डी.डी. PRINCIPAL, GOVERNMENT POLYTECHNIC, JALNA PAYABLE AT JALNA यांचे नावाने काढून ओरीजनल डी.डी. निविदेसोबत सादर करावे.

४. पात्र निविदाधारकाची बयाणा रक्कम ही अनामत रक्कम म्हणून कार्यालयात जमा केली जाईल.

५. रकान्यात सुचविलेले सर्व कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करण्यात यावे. निविदेसोबत तांत्रिक लिफाफ्यात फक्त कागदपत्रांची छायांकित प्रती सादर करावयाची आहे. Technical Bid तांत्रिक लिफाफ्यात मागणी केलेले ओरीजनल कागदपत्रे निविदा उघडण्याची दिवशी निविदाधारकाने सोबत ठेवावे ऐनवेळी ओरीजनल कागदपत्रे सादर न केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

६. Technical Bid व Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी यासाठी शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथील कार्यालयात उपस्थित राहावे.

७. अपूर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.

८. निविदा फी व बयाणा रक्कम भरल्याशिवाय सादर केलेले निविदा ग्राह्य धरले जाणार नाही.

९. Technical Bid चे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का असावा.

१०. निविदाधारकाकडे अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे एफ. डी. ए. चे सर्टीफीकेट नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

११. अन्न व औषध प्राधिकरणाकडून तपासणी झाल्यास त्यानुसार कार्यवाही करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. कोणत्याही कायद्याचा किंवा नियमांचा भंग झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१२. कंत्राटदारास विद्युत देयकापोटी सबमीटर मधील रीडींगप्रमाणे येणारी रक्कम वीजबिल दरमहा ५ तारखेला स्वतः रोखपाल यांचेकडे महिना भरल्यानंतर न चुकता जमा करणे बंधनकारक राहील. तसेच विदयुत सब मीटर बंद पडल्यास किमान १००० रुपये वीज बिल आकारण्यात येईल.

१३. कंत्राटदारास उपहारगृह / कँटीन जागेसाठीचे भाडे नाममात्र रुपये १५००/- दरमहा ५ तारखेला स्वतः रोखपाल यांचेकडे महिना भरल्यानंतर न चुकता जमा करणे बंधनकारक राहील.

१४. अन्न विषबाधा होणार नाही याची दक्षता घेणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. अन्नातून / पाण्यातून विषबाधा झाल्यास उपहारगृह चालकास / कंत्राटदारास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल.

१५. उपहारगृहसाठीचे फर्निचर, साहित्य / भांडी कंत्राटदाराने स्वतः उपलब्ध करणे बंधनकारक आहे. तसेच त्याची सुरक्षितेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१६. उपहारगृहामध्ये स्वच्छता, शातंता व चांगली वर्तणूक ठेवणे इ.ची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७. उपहारगृहातील सर्व सेवकांची माहिती संस्थेला लेखी स्वरूपात द्यावी लागेल. तसेच कोणताही सेवक गेल्यास व नवीन सेवक नेमल्यास त्याची माहिती देणे बंधनकारक राहील.

१८. उपहारगृहात बाल व वैद्यकीयदृष्ट्या अपात्र कामगार ठेवता येणार नांही. उपहारगृह व जवळचा परिसर स्वच्छ ठेवणे, कामगारांचे कपडे स्वच्छ ठेवणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१९. कंत्राटदारास उपहारगृहात काम करणाऱ्या सर्व कामगारांना स्वच्छता व सुरक्षेविषयी प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.

२०. उपहारगृह परिसरात अग्निशमन यंत्र बसविणे व अद्ययावत ठेवणे याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२१. उपहारगृह परिसरात कोणताही अपघात होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक आहे. अपघात झाल्यास नुकसानभरपाई करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.



Scanned with OKEN Scanner

२२. उपहारगृहात पानबिडी, सिगारेट, तंबाखू, गुटखा, मादक पदार्थ ठेवण्यास मनाई राहील. तसेच कंत्राटदार व त्याचे कर्मचारी ह्यांना वरील पदार्थाचे सेवन करण्यास मनाई राहील. उपहारगृहात कुठलेही बेशिस्त व अशोभनीय कृत्य होऊ न देण्याची जवाबदारी कंत्राटदाराची राहील.

२३. कंत्राटदारने उपहार गृहातील सेवा पुरविण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ ठेवणे बंधनकारक आहे.

२४. शासकीय नियमाप्रमाणे प्लास्टीक पिशवी, प्लास्टीक चहाचे कप (Use and throw) यासारख्या प्लास्टीक वस्तुंचा वापर करण्यास मनाई राहील.

२५. प्लास्टीक पाणी बॉटल व इतर प्लास्टीक साहीत्याची वेळोवेळी विल्हेवाट लावण्याची जवाबदारी कंत्राटदाराची राहील.

२६. कंत्राटदारास उपहारगृहामध्ये स्वयंपाकासाठी लागणारे व विद्यार्थी / विद्यार्थीनींना लागणारे पिण्याचे पाणी याची व्यवस्था स्वतः करावे लागेल.

२७. उपहारगृहाची वेळ सकाळी ७.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत असेल.

२८. उपहारगृहाचा वापर कुठल्याही परिस्थितीत निवासाकरीता करता येणार नाही. तसेच कोणतीही व्यावसायिक उत्पादने व कंपनीची जाहिरात करण्यात सक्त मनाई राहील.

२९. उपहारगृहात कोणत्याही प्रकारचे प्राणी वा पक्षी पाळता येणार नाही.

३०. कंत्राटदारास करार मुदतीपूर्वी उपहारगृह बंद करावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पूर्वसूचना लेखी द्यावी लागेल.

३१. कंत्राटदारास सत्र कालावधी संपेपर्यंत उपहारगृह चालू ठेवणे बंधनकारक राहील मध्येच सेवा सोडून गेल्यास नुकसान भरपाई स्वरूपात बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

३२. उपहारगृहातील पदार्थ व त्यांचा प्रचलित बाजारभाव याचा विचार करून निविदा समितीने ठरविलेल्या दरानुसार दरपत्रकात दर नमूद करावे. तसेच सर्व पदार्थांचे दर दरपत्रकात देणे बंधनकारक राहील. दरपत्रकातील पदार्थांच्या एकूण बेरीजेचा रकमेच्या तुलनेत कमीत कमी निविदा दर असलेल्या निविदाधारकास उपहारगृह चालविण्याचे कंत्राट देण्यात येईल.

| अ.क्र. | पदार्थ / आयटम | नग / विवरण | दर रुपये |
|---|---|---|---|
| १. | समोसा | १ नग ६०ग्रॅम | १५ |
| २ | कचोरी | १ नग ६०ग्रॅम | १५ |
| ३ | पोहा | १ प्लेट १००ग्रॅम | १५ |
| ४ | कॉफी | फूल | १० |
| ५ | दूध | फूल | १० |
| ६ | चहा | १ कप | १० |
| ७ | शाबुदाना खिचडी | १ प्लेट १००ग्रॅम | २० |
| ८ | ब्रेड पकोडा | १ नग | १५ |
| ०९ | भजे | १ प्लेट ६०ग्रॅम | १५ |
| १० | उपम्मा | १ प्लेट १००ग्रॅम | १५ |
| ११ | वडा पाव | १ नग | १५ |
| १२ | पुरी भाजी | १ प्लेट (५ पुरी १ वाटी भाजी) | ३० |
| १३ | शिरा | १ प्लेट १००ग्रॅम | १५ |
| | एकूण बेरीज | | २०० |



Scanned with OKEN Scanner

३३. दरपत्रकातील पदार्थांच्या व्यतिरिक्त काही पदार्थ / पॅकींग फूड ठेवावयाचे असल्यास संस्थेद्वारा गठीत गुणवत्ता समितीकडून पूर्व परवानगी घ्यावे लागेल. तसेच सीलबंद पदार्थ एमआरपी पेक्षा जास्त दराने विकता येणार नाही.

३४. निविदादर हे निविदेचे कार्यादेश दिलेल्या तारखेपासुन ११ महिन्यापर्यंतच वैध राहील. उपहारगृहातील पदार्थांची गुणवत्ता व काम समाधानकारक आढळल्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना यांना राहील.

३५. उपहारगृहातील व्यवस्थेची गुणवत्ता संस्थेद्वारा गठीत समितीतर्फे वेळोवेळी तपासण्यात येईल तसेच समितीमार्फत वेळोवेळी सूचित केलेले निर्देशांप्रमाणे गुणवत्तेत सुधारणा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. विद्यार्थ्यांकडून / अधिकारी कर्मचाऱ्यांकडून व्यवस्थेच्या गुणवत्तेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी ही समिती करेल.

३६. उपहारगृहामध्ये शिस्तीचे वातावरण ठेवणे बंधनकारकं राहील. मुलांचे, मुलींचे व संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांचे बैठक व्यवस्था वेगवेगळी ठेवावी लागेल.

३७. निविदाधारकाची कसलीही अट व शर्त मान्य करण्यात येणार नाही.

३८. ज्या निविदाधारकाने निविदा भरली आहे त्यानेच सेवा पुरवावी. इतरांना उपहारगृह चालविण्यासाठी देता येणार नाही. असे आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कंत्राट संपुष्टात आणण्यात येईल.

३९. कंत्राटदारास उपहारगृहात सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक राहील.

४०. कंत्राटदाराकडे उपहारगृहात GST Number असलेले Printed देयक बुक असणे बंधनकारक राहील.

४१. कंत्राटदारास पदार्थनिहाय दरपत्रक तयार करून दर्शनी भागास लावणे बंधनकारक राहील.

४२. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचे किवा रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना याचेकडे राखुन ठेवले आहेत.

४३. गुणवत्तेबाबत तीनपेक्षा जास्त तक्रारी प्राप्त झाल्यास कंत्राट संपुष्टात आणून निविदेतील एलएस-२ यास कंत्राट देण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांना राहील

४४. सदरील निविदा बाबत कसलाही वाद उपस्थित झाल्यास याबाबत न्यायालयीन कार्यक्षेत्राकरीता जालना मुख्यालय राहील.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, जालना.



Scanned with OKEN Scanner

खालील तपशिलाप्रमाणे कागदपत्रांची छायांकित प्रत तांत्रिक लिफाफ्यात शीलबंद करून सादर करावेत.

## प्रपत्र "अ"

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | जोडले असल्यास √मार्क करावे |
|---|---|---|
| ०१ | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत उपहारगृह / कॅन्टीन नोंदणी असल्याचा दाखला/ प्रमाणपत्र किंवा उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र/ नगरपरिषद यांचेकडील उपहारगृह / कॅन्टीन चालविण्याचे प्रमाणपत्र | |
| ०२ | अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र | |
| ०३ | वस्तू व सेवा कर कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र (जीएसटी प्रमाणपत्र) | |
| ०४ | शासकीय / निमशासकीय / खाजगी / संस्था /बँक /शाळा /कंपनी येथे मागील १ वर्षापासून उपहारगृह / कॅन्टीन व्यवसाय किंवा समव्यवसाय, उपहारगृह चालवण्याचे १ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र | |
| ०५ | निविदा फी भरल्याची पावती झेरॉक्स (रू.५००/—) | |
| ०६ | बयाणा रकमेचा डीडी (रू.१००००/—) | |
| ०७ | पॅन कार्डची सत्यप्रत | |
| ०८ | आधार कार्डची सत्यप्रत | |
| ०९ | काळया यादीत नसल्याबाबत चे हमीपत्र | |
| १० | सध्या उपहारगृह / कॅन्टीन चे काम करत असलेल्या कामाविषयीचे कार्यदेशाच्या सत्यप्रती | |
| ११ | निविदाधारकाची माहिती | |

टीप - वरीलपैकी कोणतेही कागदपत्र लागू नसल्यास तसे प्रमाणपत्र निविदेतील तांत्रिक लिफाफ्यात जोडावे.
तसेच अ.क्र.०१ ते ११ व्यतीरीक्त अनावश्यक कागदपत्रे जोडण्यात येवु नयेत.



Scanned with OKEN Scanner

# " प्रपत्र - ब"

## निविदाधारकाची माहिती

१) निविदा धारकाचे / केटरींग एजन्सीचे नाव :-.......................................................................

२) मालकाचे / भागीदाराचे नाव व संपूर्ण पत्ता :-

.................................................................................................

.................................................................................................

३) दुरध्वनी क्रमांक:-.............................................................................

- निवास:-...............मोबाईल नंबर:-.......... .....ईमेल :-.........................
- उपहारगृह / व्यवसायाचे ठिकाण :-.................................
- संपर्कासाठी प्रतिनिधीचे नांव :-...................................मोबाईल नंबर :-...............

4) कॅटरिंगशी संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास/उच्चतम अर्हतेचा तपशिल द्यावा :-

.................................................................................................

५) अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक परवाना नोंदणी क्रमांक :-.............................................

६) व्यवसायकर / जीएसटी नोंदणी नंबर :-...........................

७) मनुष्यबळाची संख्या ..................... स्त्री................. पुरुष..............

८) या व्यवसायासंबंधी प्रलंबीत खटला / शिक्षेबद्यलची माहिती :..................................

९) सदर प्रकारची सेवा या पुर्वी / सद्यपरिस्थितीत किती व कोणत्या प्रतिष्ठाणाकरीता देत आहे त्याचा तपशील

:.................................................................................................

.................................................................................................

१०)प्रति वर्ष व्यवसायाचा उलाढाल / टर्नओव्हर ......................................................

११)आयकर पॅन नंबर........................

१२)आधारकार्ड नंबर .............

१३)बँक खाते क्रमांक...................

१४)आयएफएससी कोड.......................

मी निवेदन करतो की, उपरोक्त संपूर्ण माहिती सत्य आहे. पुरविलेली माहिती खोटी आढळल्यास माझी निविदा रद्य होण्यास पात्र राहील.

निविदाधारकाची सही व शिक्का



Scanned with OKEN Scanner

# " प्रपत्र - क"

## घोषणापत्र

(काळया यादीत नसल्याबाबत)

मी / आम्ही मे ........................................................................ कंत्राटदार असे जाहीर करतो की, आमची संस्था मे.......................................................................... ......... ला महाराष्ट्र राज्य किंवा इतर कोणत्याही सरकारी संस्थेने निविदेत भाग घेण्यासाठी मागील पाच वर्षात काळया यादीत टाकलेली नाही. किंवा निविदा प्रकीयेत सहभाग घेण्यासाठी बंदी घातलेली नाही. तसेच संस्था / संस्था चालक यांच्या विरूध्द कोणत्याही खटला प्रलंबित नाही.

स्वाक्षरी ...........................

नाव ...........................

संस्थेचे नाव व पत्ता ..........................................

संस्थेचा शिक्का ............................

दिनांक ...........................



Scanned with OKEN Scanner